कृषि एवं किसान
कल्याण मंत्रालय
MINISTRY OF
AGRICULTURE AND
FARMERS WELFARE
सत्यमेव जयते

ग्रामीण विकास मंत्रालय
भारत सरकार
MINISTRY OF RURAL
DEVELOPMENT
GOVERNMENT OF INDIA
सत्यमेव जयते

# नैसर्गिक शेतीतील निविष्ठा




**राष्ट्रीय जैविक आणि नैसर्गिक शेती केंद्र**

हापूर रोड, कमला नेहरू, गाझियाबाद – २

☎ ०१२० -२७६४२१२, २७६४९०६; फॅक्स ०१२० - ७६४९०

ई _ मेल : nbdc@nic.in

# नैसर्गिक शेतीमध्ये कोणत्या निविष्ठांचा वापर केला जातो?

## बीजामृत




- **साहित्य**

अ. पाणी - २० लिटर
आ. गायीचे शेण - ५ किलो
इ. गोमुत्र - ५ लिटर
ई. चुना - ५० ग्रॅम
उ. मुळाजवळील माती – मूठभर

- **कृती**

- ५ किलो देशी गायीचे शेण घ्या आणि सुती कापडात गुंडाळा.
- बादलीत २० लिटर पाणी घ्या आणि त्यात कापडाने गुंडाळलेले ५ किलो शेण बुडवा.
- अशा प्रकारे बुडविलेले शेण १२ ते १६ तास राहू द्या म्हणजे शेणाचा अर्क पाण्यात येईल.
- १ लिटर पाणी असलेल्या दुसऱ्या भांड्यात ५० ग्रॅम चुना घ्यावरील प्रमाणे तयार झालेले दोन्ही मिश्रणे एकत्र करा व ५० ग्रॅम मुळाजवळील मातीत टाका.
- या मिश्रणामध्ये ५ लिटर गोमुत्र कालवून हे द्रावण ८ ते १२ तास ठेवून द्यावे
- अशा प्रकारे तयार झालेले बिजामृत बीजप्रक्रियेकरिता वापरावे

- **वापर**

कोणत्याही पिकाच्या बियाण्यांमध्ये बीजामृत घाला; हाताने मिसळून बियाण्यास थर लावा; ते चांगले सुकूद्या आणि पेरणीसाठी वापरा. शेंगा लागणाऱ्या पिकाच्याबियाण्याचे आवरण पातळ असते त्यामुळे असे बियाणे बिजामृतामध्ये बुडवा आणि लगेच सुकू द्या.



**फायदे-**

- बियाण्याची जैव क्षमता वाढते
- बीजजन्य रोगांना प्रतिबंध करते.

# जीवामृत




- **साहित्य**
  - पाणी - २00 लिटर
  - गायीचे शेण- १० किलो
  - गोमूत्र - १० लिटर
  - गूळ - २ किलो
  - डाळीचे पीठ/ बेसन - २ किग्रॅ
  - मुळाजवळील माती - मूठभर

- **कृती**
  - एक एकर शेतीसाठी एका ड्रममध्ये २00 लिटर पाणी घ्या.
  - पाण्याने भरलेल्या या ड्रममध्ये १० लिटर गोमूत्र टाकावे (शक्यतो देशी गोमूत्र).
  - वरील द्रावणात १० किलो गायीचे शेण टाका.
  - वरील द्रावणात २ किलो गूळ टाका.
  - वरील द्रावणात २ किलो डाळीचे पीठ/ बेसन टाका.
  - वरील द्रावणात मूठभर मुळाजवळील माती टाका.
  - लाकडी काठीने घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवून वरील सर्व साहित्य नीट ढवळून घ्या.
  - ड्रम गोणपाटाणे झाकून ठेवा.
  - हे द्रावण आंबवण्यासाठी सावलीत ४८ तास स्थिर ठेवा.

- **वापर**
  - पाण्यात मिसळून फवारणी करावी
  - सिंचनाच्या पाण्यासोबत वापरावे

- **फायदे**
  - ५-१०% पाण्यात मिसळून फवारल्यास पिकाची वाढ व फुल धरणीस सहाय करून उत्पादन वाढ घडवितेसिंचनाच्या पाण्यासोबत वापरल्यास जमिनीची सुपीकता वाढवते



# घन- जीवामृत




- **साहित्य**

अ. गायीचे शेण - १०0 किलो
आ. गोमूत्र - आवश्यकतेनुसार
इ. गूळ - १ किलो
ई. डाळीचे पीठ/ बेसन - २ किग्रॅ
उ. मुळाजवळील माती - आवश्यकते नुसार

- **करावयाची कृती**

- १०० किलो चांगले वाळलेले शेण घ्या आणि ते पातळ थराच्या स्वरूपात जमिनीवर एकसारखे पसरवा.
- त्यात थोडे (कमी प्रमाणात) गोमूत्र टाका.
- शेणखतावर १ किलो डाळीचे पीठ/ बेसन पसरवा.
- २ किलो गूळ पसरवा.
- आवश्यकते नुसार मुळाजवळील माती टाका.
- वरील सर्व साहित्य नीट मिसळून लाडू बनवा.
- ते कोरडे होऊ द्या.
- सुकल्यावर सर्व लाडू फोडून बारदानामध्ये साठवा.
- हे वाळलेले घन-जीवामृत ६ महिन्यांपर्यंत साठवता येते

- **वापर**

- पेरणीच्या वेळी १०० किलो वाळलेले घनजीवामृत प्रति एकर या प्रमाणे वापरा

- **फायदे**

जमिनीतील सूक्ष्मजीवांच्या क्रियाकलापांना चालना देऊन मोठ्या प्रमाणात सेंद्रिय खतांचे जलद विघटन करून पोषक तत्वांची उपलब्धता वाढवते.



# निमास्त्र

▪




▪ **साहित्य**

- कडुलिंबाची पाने - ५ किलो
- गोमूत्र - ५ लिटर
- गायीचे शेण - १ किलो
- पाणी - १०० लिटर

▪ **कृती**

- पाच किलो कडुनिंबाची हिरवी पाने घ्या किंवा पाच किलो सुकलेली निंबोळी घ्या आणि पाने किंवा निंबोळी बारीक करा.
- ही बारीक केलेली कडुनिंबाची पाने किंवा निंबोळी पावडर १०० लिटर पाण्यात टाका.
- त्यात ५ लिटर गोमूत्र टाकून एक किलो गायीचे शेण मिसळा.
- हे मिश्रण लाकडाने ढवळून ४८ तास झाकून ठेवा.
- हे मिश्रण दिवसातून तीन वेळा ढवळा आणि ४८ तासांनंतर कापडाने गाळून पिकावर फवारणी करा.

▪ **वापर -** २-३ % पाण्यात मिसळून फवारणी करा

▪ **फायदे:**

रस शोषक कीटक आणि लहान सुरवंट यांच्या व्यवस्थापनासाठी.



# ब्रम्हास्त्र




**साहित्य**

- कडुलिंबाची पाने - 3 किलो
- करंजची पाने - २ किलो
- सीताफळाची पाने - २ किलो
- पपईची पाने - २ किलो
- पेरूची पाने - २ किलो
- गोमूत्र - १० लिटर

**कृती**

- १० लिटर गोमूत्र घ्या
- त्यात ०३ किलो कडुनिंबाची हिरवी पाने ठेचून टाका.
- ०२ किलो ठेचलेली करंज पाने टाका.
- ०२ किलो सीताफळाची पाने घाला.
- ०२ किलो ठेचलेली पपईची पाने घाला.
- ०२ किलो ठेचलेली पेरूची पाने घाला.
- आता हे सर्व मिश्रण गोमूत्रात विरघळवून उकळून घ्या.
- ३-४ उकळी आल्यावर विस्तवावरून खाली उतरवा.
- ४८ तास थंड होऊ द्या आणि नंतर कपड्याने द्रावण गळून घ्या.
- आता द्रावण पिकावर फवारण्यासाठी तयार आहे.

- **वापर - २-३ % पाण्यात मिसळून फवारणी करा**
- **वापराचे फायदे:** रसशोषक कीटक आणि शेंगा/फळ पोखरणाऱ्यां किडीच्या नियंत्रणासाठी.



# अग्निस्त्र




- **साहित्य**
- कडुलिंबाची पाने - ०५ किलो
- हिरवी मिरची - ०.५ किलो
- लसूण - ०.५ किलो
- गोमूत्र – २० लिटर

- **कृती**
- २० लिटर गोमूत्र घ्या
- त्यात ०५ किलो कडुलिंबाची हिरवी पाने ठेचून टाका.
- ०.५ किलो ठेचलेली हिरवी मिरची टाका.
- ०.५ किलो ठेचलेला लसूण घाला.
- आता हे सर्व मिश्रण गोमूत्रात विरघळवून उकळून घ्या.
- ३-४ उकळी आल्यावर विस्तवावरून खाली उतरवा.
- ४८ तास थंड होऊ द्या आणि नंतर कापडाने द्रावण गळून करा.
- आता द्रावण पिकावर फवारण्यासाठी तयार आहे

- **कसे वापरायचे?**

  २-३ % पाण्यात मिसळून फवारणी करा

- **फायदे:** झाडाच्या खोडात किंवा देठात राहणाऱ्या कीटकांसाठी व सर्व प्रकारचे मोठे बोंडअळी आणि सुरवंट यांच्या व्यवस्थापनासाठी



# दशपर्णी अर्क




- **साहित्य**
- कडुलिंबाची पाने - ५ किलो
- निर्गुडीची पाने- २ किलो,
- सापसण/ बदक वेलची पाने -२ किलो,
- पपईची पाने २ किलो,
- गुळवेलाची पाने २ किलो,
- सीताफळ पाने २ किलो,
- करंजची पाने २ किलो,
- एरंडीची पाने २ किलो,
- कन्हेराचीपाने- २ किलो,
- रुईची पाने २ किलो,
- हिरवी मिरची पेस्ट २ किलो,
- लसूण पेस्ट - २५0 ग्रॅम,
- गायीचे शेण - ३ किलो,
- गोमूत्र - ५ लिटर

- **कृती**
- २00 लिटर पाणी घ्या.
- त्यात वरील सर्व साहित्य टाका.
- एक महिना आंबू द्या आणि नंतर कापडाने द्रावण गाळून घ्या.
- आता द्रावण पिकावर फवारण्यासाठी तयार आहे

- वापर
  २-३ % पाण्यात मिसळून फवारणी करा
- **वापराचे फायदे:** सर्व प्रकारचे रसशोषक कीटक आणि सर्व अळी/सुरवंटांच्या नियंत्रणासाठी.

